Smt. Saroj R. Dhumane – Founder Chairman
Kalpataru Samajseva Mitra Mandal's
DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL
COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE
Accredited by NAAC with 'B' Grade
Recognised by – Govt. of Maharashtra & NCH, New Delhi & Affiliated to – MUHS, Nashik
Website: dhanvantaribhms.org | E-mail: dhanvantaricollege@yahoo.com | Reg. No. F-3116
Address: Dhanvantari Campus, Kamatwade, Cidco, Nashik - 422008 ☎ 0253-2377103, 2393748

Ref. No.:

Date: 05/02/25

**ANNEXURE-II**

**Trust Deed / Bylaws / Registration Certificate**

**(Trust/ Hospital (Bombay Nursing Act))**

**Name of College / Institute: Dhanvantari Homoeopathic Medical College and Hospital & Research Centre, Nashik**

**College Code: 4308**

| Sr.No. | Name of Trust / Society | Details |
|---|---|---|
| | Kalpataru Samajseva Mitra Mandal, Nashik | |
| 1 | Registration Certificate | Trust/Society : Yes, Attached<br>Hospital (Bombay Nursing Act) : Yes, Attached |
| 2 | Name of the College/Institute (As per First Affiliation letter or As per Change of Name Proposal Approved by the University) | Dhanvantari Homoeopathic Medical College and Hospital & Research Centre, Nashik |
| 3 | Address with Pincode | Dhanvantari Campus, Kamatwade, Cidco, Nashik-422008 |
| 4 | Email ID | dhanvantaricollege@yahoo.com |
| 5 | Telephone / Mobile No.(s) | 0253-2377103 / 2393748, Mob. 9850742959 |
| 6 | Website Address | www.dhanvantaribhms.org |

PRINCIPAL
Dhanvantari Homoeopathic Medical College
and Hospital & Research Centre,
Nashik

सौ. सरोज रावसाहेब घुमणे (पाटील)

हे दुय्यम प्रत [illegible] सहायक धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्या अर्ज क्र. ८/९८ विशेष/ध.आ./मु.मा.वि./२म. वरील दि. ११/१०/९८ च्या आदेशान्वये देण्यात येत आहे.
ठिकाण : नाशिक
दि. ३३/११/९८

[signature]
स. ध. आ., नाशिक

सत्यमेव जयते

## नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये नाशिक विभाग नाशिक येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव कल्पतरु समाजसेवा मित्र मंडळ नाशिक, जि. नाशिक

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक एफ-३११६ (नाशिक)

सौ. सरोज रावसाहेब घुमणे (पाटील) यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक ५/१/१९९३ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

शिक्का

सहायक धर्मादाय आयुक्त * नाशिक प्रदेश, नाशिक *

सही Sd.

पदनाम सहायक धर्मादाय आयुक्त
नाशिक विभाग, नाशिक

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE * NASHIK

कार्यादेश क्र.२३/२०१८

# नाशिक महानगरपालिका नाशिक

## फॉर्म 'सी'

**सन १९४९ च्या दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन**
**ॲक्टच्या कलम ५ अन्वये दिलेले रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट**

दि बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट १९४१ अन्वये श्री. / श्रीमती सिमा जयवंत घुमरे
सरोजताई घुमरे-पाटील हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर धन्वंतरी कॅम्पस कामटवाडे सिडको नाशिक
येथील नर्सिंग होम /हॉस्पिटल/ मॅटर्निटी होम रजिस्टर केले असून सदरचे नर्सिंग होम/हॉस्पिटल/मॅटर्निटी होम चालविण्यास परवाना देण्यात येत आहे.



रजिस्ट्रेशन क्र : 1902 — हॉस्पिटलसाठी — कॉटस्
प्रसूतीसाठी 4 कॉटस्
रजिस्ट्रेशन दि : 3/01/23 — इतर रूग्णासाठी 21 कॉटस्
अत्यावश्यक 25 कॉटस्

ठिकाण : नाशिक

सर्टिफिकेट दिल्याचा दिनांक
सदरचे सर्टिफिकेट चा कालावधी दिनांक ३१ मार्च २०26 पर्यंत राहील.

उपरोक्त कालावधीत वेळोवेळी B.M.W. चे नुतनीकरण व अग्निप्रतिबंधकचे बी फॉर्म सादर न केल्यास सदरचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.

नाशिक महानगरपालिका, नाशिक * वैद्यकिय विभाग *

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE * NASHIK

3/1/2023
आरोग्य वैद्यकिय अधिकारी
नाशिक महानगरपालिका, नाशिक

१०) शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या ध्येय-धोरणांची व कल्याणकारी योजनांची माहिती तसेच केंद्र शासन - राज्य शासन, समाज कल्याण स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत जाहिर झालेल्या योजनांची माहिती व लाभ जनतेला मिळवुन देण्याचा प्रयत्न करणे. इति...

११) विविध वयोगटातील व परिसरातील नागरिकांसाठी व्यायाम मंदिर उभारणे व त्याद्वारे बलवान असे युवक घडविण्याचा प्रयत्न करणे, कॅरम, चेस, क्रिकेट, हॉकी, कबड्डी, आदी खेळांना प्रोत्साहन देणे व त्यांचा बौध्दिक विकास घडविण्यास मदत करणे.

५) कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक या नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर कार्यकारी म्हणुन सदरहु संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आलेला आहे. अशा सुधारित कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपुर्ण नांवे पत्ते, हुद्दे, वय व्यवसाय व राष्ट्रीयत्व खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | संपुर्ण नांव | पत्ता | हुद्दा | वय | व्यवसाय | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. सरोज रावसाहेब धुमणे | ''अमृतवेल'', डॉ. रामदास कॉलनी, प्लॉट नं.१, शरणपुर रोडनासिक-५. | अध्यक्ष | ५६ | समाजसेवा | भारतीय |
| २. | श्री. बारकु सोनुजी भामरे | क्रांतीनगर, मखमलाबाद रोड, पंचवटी, नासिक-३. | उपाध्यक्ष | ५२ | व्यापार | भारतीय |
| ३. | श्री. जयंत रावसाहेब धुमणे | लक्ष्मीनिवास, जाजुवाडी, पेठरोड, पंचवटी, नासिक-३. | सचिव | ३० | व्यापार | भारतीय |
| ४. | श्री. चंद्रकांत धर्माजी गुंजाळ | लक्ष्मीनिवास, जाजुवाडी, पेठरोड, पंचवटी, नासिक-३. | खजिनदार | ५७ | नोकरी | भारतीय |
| ५. | डॉ. मनिषा अनिल बागुल | ''स्वराजव्हिला'', प्लॉट नं. ५१, नंदनवन, चानसी. | सभासद | ३२ | नोकरी | भारतीय |
| ६. | सौ. हिराबाई वामनराव चव्हाण | जाजुवाडी, जाजु चाळ, पंचवटी, नासिक-३. | सभासद | ६० | घरकाम | भारतीय |
| ७. | सौ. उषा भिकाजी आहेर | संभाजी नगर, पुणे. | सभासद | ३५ | घरकाम | भारतीय |

६) आम्ही खालील सह्या करणारे कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक चे सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असुन वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवुन ''कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ'', नासिक ही संस्था आज दिनांक १२-१२-१९९१ रोजी स्थापन केलेली असुन ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

सत्यप्रत

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग नाशिक

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE NASHIK

अर्ज क्र. .........../ २२
अर्जदाराचे नांव : श्रीम. सरोजा ... महाले - पाटील
नक्कल सेवा शुल्क रुपये: ८०/-
पैसे भरण्याचा दिनांक : ११-७-२२

(५)

Ex. 3.

## कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक या संस्थेची नियम व नियमावली

१) संस्थेचे नांव व पत्ता : कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक
अमृतवेल, डॉ. रामदास कॉलनी, प्लॉट नं.१, शरणपूर रोड, नासिक-५.

नक्कल अर्ज मिळाल्याचा दि. २४-६-२२
नक्कल दिल्याचा दि. ११-७-२२
नक्कल तयार करणार
नक्कल रुजुवात करणार -

संस्थेचे कार्यक्षेत्र : भारत देश

हिशोबाचे वर्ष : १ एप्रिल ते ३१ मार्च

४) सभासदत्व व त्याची नोंदणीची पध्दतः

१८ वर्ष वय पूर्ण असलेल्या कोणाही भारतीय (स्त्री/पुरुष) व्यक्तीस संस्थेचे सभासदर होता येईल. संस्थेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्याने प्रथम कार्यकारी मंडळाकडे विहित केलेल्या नमुन्यात लेखी अर्ज करणे आवश्यक आहे. व सभासदत्वासाठी आवश्यक असलेली वर्गणी/देणगी भरणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीस सभासद करून घ्यावयाचे किंवा नाही या विषयांचे अधिकार संपूर्णपणे कार्यकारी मंडळास असतील.

५) सभासदाचे प्रकारः सभासदाचे प्रकार खालील प्रमाणे राहतील.

अ) आजीव सभासदः
जी व्यक्ती संस्थेस रुपये १००१/- किंवा त्यापेक्षा अधिक वर्गणी देईल अशा व्यक्तीस संस्थेचे आजीव सभासद समजण्यात येईल.

ब) सामान्य सभासदः
जी व्यक्ती रुपये १०१/- किंवा त्यापेक्षा अधिक वार्षिक वर्गणी देईल अशा व्यक्तीस सामान्य सभासद समजण्यात येईल.

सह. अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक

सभासदत्व रद्द होणेः सभासदाचे सभासदत्व पुढील कारणास्तव रद्द होईल किंवा रद्द केले जाईल.

१) सभासदाने निवृत्त होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास अथवा राजीनामा दिल्यास अथवा मयत झाल्यास.
२) शारीरीकदृष्ट्या सभासद म्हणुन काम करण्यास असमर्थ असल्यास.
३) सभासदास नैतिक गुन्ह्याखाली फौजदारी न्यायालयात शिक्षा झाल्यास.
४) सभासद वेडा झाल्यास अगर त्यास/तीस मानसिक किंवा शारीरीक दुर्बलता आली किंवा झाली असल्यास.
५) कोणत्याही सभासदाचे वर्तन संस्थेच्या हितसंबंधीविरोधी अगर अनिष्ठ वाटल्यास कार्यकारी मंडळाच्या सभेत बहुमताने ठराव संमत करून त्याचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE ★ NASHIK

७) सर्वसाधारण सभाः

संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याचे आत घेतली जाईल. सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वश्रेष्ठ व अंतिम निर्णय देणारी सभा राहील. आजीव सभासद व सामान्य सभासद यांचा त्यात समावेश राहील. सभेची सुचना सभासदांना १४ दिवस अगोदर दिली जाईल. सदर सभेसाठी एकुण सभासदांच्या २/३ सभासद संख्येइतकी गणपुर्ती आवश्यक राहील.

गणपुर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्यातासाने त्याच दिवशी त्याच ठिकाणी सभा घेतली जाईल व त्यासाठी गणपुर्तीची आवश्यकता नाही.

८) सर्वसाधारण सभेचे अधिकार व कार्यः

१) मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे.

२) गतवर्षीचे संस्थेच्या अहवालास मंजूरी देवून पुढील वर्षाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

३) गतवर्षीचे हिशोब मंजूर करणे.

४) पुढील वर्षाकरीता हिशोब तपासणीची नेमणूक करणे व त्याची फी ठरविणे.

५) संस्थेच्या नियमावलीस ३/५ सभासदाचे बहुमताने आवश्यक ती दुरूस्ती, वाढ व बदल करणे.

६) दर पाच वर्षानी संस्थेच्या कार्यकारी मंडळाची निवड करणे.

७) अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करून अंतिम निर्णय घेणे.

९) विशेष सर्वसाधारण सभा व त्याची कार्यः

तातडीने व महत्वाचे कामासाठी संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा अध्यक्षांना बोलविता येईल. तसेच संस्थेच्या १/३ सभासदांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्ष विशेष सर्व साधारण सभा बोलविण्याची कार्यवाही करतील. विशेष सर्वसाधारण सभेकरीता सुचना व गणपुर्ती ही सर्वसाधारण सभे प्रमाणे राहील.

१०) संस्थेचे कार्यकारी मंडळः

संस्थेचे कार्यकारी मंडळ कमीत कमी सात व जास्तीत जास्त अकरा सदस्याचे राहील. त्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व खजिनदार असे तीन पदाधिकारी व इतर सदस्य राहातील. कार्यकारी मंडळ हे विश्वस्त म्हणुन संस्थेचे काम पाहातील.

११) कार्यकारी मंडळाचा कार्यकाळ हा पाच वर्षाचा राहील. कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य यांची निवड सर्वसाधारण सभा बहुमताने करील.

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |
|---|---|---|

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE NASHIK

१२) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामेः

अ) अध्यक्ष :

१) सर्वसाधारण सभेचे व कार्यकारी मंडळाचे सभेचे अध्यक्षपद भूषविणे व समसमान मतदानाचे वेळी एक जादा मत देणे.

२) सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळाच्या सभा बोलविणे व सभेचे कामकाज चालविणे.

३) तातडीचे कामाकरीता कार्यकारी मंडळाच्या सभा बोलविणे सभा बोलविणे व सभेचे कामकाज चालविणे.

४) संस्थेच्या सर्व कामावर देखरेख ठेवणे.

५) आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर संस्थेतर्फे सह्या करणे.

६) कार्यकारी मंडळाच्या व सर्व साधारण सभेच्या ठरावांची अंमलबजावणी करणे.

ब) उपाध्यक्षः

१) अध्यक्षांना त्यांच्या कामात सहकार्य करणे.

२) अध्यक्षांच्या अनुपस्थितीत त्यांचे कार्य करणे.

क) सचिवः

१) संस्थेच्या वतीने दैनंदिन कामकाज पाहून सर्व पत्रव्यवहार पहाणे व रेकॉर्ड ठेवणे.

२) मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने सर्व साधारण सभा, विशेष सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळाच्या सभा बोलविणे व त्या सभांना हजर राहणे.

३) सर्व सभांचे इतिवृत्त वहित नोंद करणे.

४) संस्थेचे संपूर्ण जमा खर्च लिहीणे, वार्षिक अहवाल व अंदाजपत्रक तयार करणे व सभांना सादर करणे.

५) हिशोब तपासणीसांना संस्थेचे कागदपत्र सादर करणे.

६) कर्मचाऱ्यांचे अधिकार व कामे ठरवून देणे.

७) व्यवस्थापक मंडळाने सोपविलेले कामकाज पाहाणे.

८) संस्थेचे आर्थिक व्यवहार सांभाळणे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

DHANWANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE ★ NASHIK

१३) कार्यकारी मंडळाची सभाः

अ) कार्यकारी मंडळाची सभा कमीत कमी तीन महिन्यातुन एकदा घेण्यात येईल आवश्यकता भासल्यास अध्यक्ष कार्यकारी मंडळाची सभा केंव्हाही बोलावू शकती.

ब) मागणीची सभा कार्यकारी मंडळातील एकुण पदाधिकारी व सदस्या यापैकी १/३ सदस्यांनी लेखी मागणी केल्यास अध्यक्षांनी अशी मागणीची सभा बोलवावी. ती तातडीचे कारणासाठी व संस्थेच्या हितासाठी असावी.

१४) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्याः

कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने सचिव सदस्यांना ८ दिवस अगोदर देतील व तातडीचे सभेच्या वेळी दोन दिवस अगोदर देण्यांत येईल. कार्यकारी मंडळाच्या होणाऱ्या सभेकरीता गणपूर्ती २/३ सदस्यांची राहील. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास त्याचदिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने कार्यकारी मंडळाची सभा घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. तसेच अध्यक्ष तातडीचे प्रसंगी परिपत्रक सभा घेतील.

१५) कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियमः

१) निवडणूक बहुमताने हात वर करून घेतली जाईल किंवा गुप्त मतदान पध्दतीने केली जाईल.

२) निवडणूकीची सर्व व्यवस्था कार्यकारी मंडळाने करावी.

३) निवडणूक अधिकाऱ्यांची निवड १५ दिवसापूर्वी सभासदांमधून कार्यकारी मंडळ करील.

४) संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणूकीसाठी तो सदस्य अपात्र ठरेल.

५) एक वर्षभर सभासद राहील्यानंतरच त्यास मतदानाचा अधिकार राहील.

६) निवडणूकीच्या तारखेची सूचना ३० दिवस अगोदर लेखी नोटीसीद्वारे देण्यात येईल.

१६) कार्यकारी मंडळातील रिक्त पद भरणे बाबतः

कार्यकारी मंडळातील एखादी जागा राजीनामा, मृत्यु इत्यादी कारणाने मुदतपूर्व रिक्त जागा ही कार्यकारी मंडळाच्या सभेत बहुमताने भरण्यांत येईल. अशा नविन सदस्यांची मुदत उरलेल्या कालावधी इतकी राहील.

१७) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्येः

१) नविन सभासदांना प्रवेश देणे.

२) सभासदाचा राजीनामा स्विकारणे व तो मंजूर करणे.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE * NASHIK

३) संस्थेच्या सर्व पगारी नोकरांची नेमणूक करणे, त्यांना तात्पुरते कामावरून दुर करणे, त्यांना दंड करणे किंवा नोकरीतुन बडतर्फ करणे, नोकरांच्या सेवा शर्ती ठरविणे व पगार निश्चित करणे.

४) गाऱ्हाणे ऐकणे व त्यांचे निरसण करणे.

५) संस्थेच्या हिशोबावर देखरेख ठेवणे व तो पडताळुन पाहणे.

६) वार्षिक हिशोब पत्रके व वार्षिक अहवाल अंदाजपत्रके तयार करणे. वार्षिक हिशोब तपासणीसाकडून तपासुन घेणे व मंजूरीसाठी सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे.

७) निश्चित केलेल्या शर्तीनुसार कर्ज उभारणे.

८) संस्थेच्या वतीने दावे मांडणे ते चालविणे व प्रतिवादी म्हणुन दावे चालविणे आणि त्यांच्या बाबतीत तडजोड घडविण्याचे अधिकार देणे.

९) सर्व साधारणपणे संस्थेचा कारभार सांभाळणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

१०) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हाती असलेल्या रोख रकमेची मर्यादा निश्चित करणे.

११) संस्थेकडे वर्गणी/देणगी, निधी/फी, अनुदान इत्यादी मार्गाने आलेला पैसा नियमितपणे बँकेला भरला जातो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणे.

१२) संस्थेचा निधी ठेवण्यासाठी बँकेची निवड करून गुंतवणूक करणे.

१३) विशेष कामाकरीता समित्या, उपसमित्या नेमणे व त्यांचे अधिकार व जबाबदाऱ्या निश्चित करणे.

१४) संस्थेच्या अंतर्गत कारभारा संबंधी उपनियम तयार करणे.

१५) हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे व कार्यवाही करणे.

१८) <u>संस्थेचा निधी मिळकत व विनियोगः</u>

संस्थेस मिळालेली वर्गणी/देणगी, निधी/फी व अनुदान तसेच इतर व्यक्ती संस्थाकडुन मिळालेले आर्थिक सहाय्य व कर्जरूपाने घेतलेली रक्कम हा संस्थेचा निधी समजण्यात येईल.

संस्थेने खरेदी केलेली अथवा बक्षिस रुपाने मिळालेली स्थावर अथवा जंगन मिळकत ही संस्थेची मिळकत समजण्यात येईल.

संस्थेचा निधी व मिळकत यांचा विनियोग संस्थेच्या नियमावलीप्रमाणे तसेच संबधीत कायद्यानूसार करण्याचा अधिकार तसेच जबाबदारी कार्यकारी मंडळाची राहील.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE NASHIK

२५) संस्थेच्या नांव व उद्देशात बदलः

संस्थेचे नांव व उद्देशात बदल करावयाचे झाल्यास ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम अथवा १२ अ प्रमाणे करण्यात येईल.

२६) विसर्जनः

संस्थेचे कार्य काही कारणामुळे बंद झाल्यास ती संस्था विसर्जीत करावयाची असल्यास ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१९) उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतुदः

संस्था सामाजिक व शैक्षणिक असल्याने संस्थेचा मुख्यतः खर्च हा शैक्षणिक व सामाजिक बाबीवरच करण्यात येईल.

प्रमाणित करण्यात येते की, सदर नियम व नियमावली कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

| | | |
|---|---|---|
| शैक्षणिक | - | ५०% |
| महिलांच्या उन्नतीसाठी | - | २५% |
| किरकोळ खर्च | - | २५% |
| | | १००% |

याप्रमाणे खर्च करण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

२०) कर्ज व ठेवी संबंधी तरतुदीः

संस्थेच्या उद्देशासाठी कर्ज अथवा ठेवी रूपाने निधी उभारता येईल. त्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३६ अ(३) अन्वये मा. धर्मदाय आयुक्त यांची पूर्व परवानगी घेता येईल.

सत्यप्रत

२१) स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतची तरतुदः

संस्थेच्या उद्देशासाठी स्थावर मिळकत खरेदी करणे कराराने घेणे, विक्री करणे, गहाण ठेवणे, भाडे पट्ट्याने देणे वर्ग इ. बाबतचे अधिकार कार्यकारी मंडळास राहातील. त्यासाठी अधिनियमाचे कलम ३६ प्रमाणे मा. धर्मदाय आयुक्त नाशिक यांची पूर्व परवानगी घेतली जाईल.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय

२२) बँक खातेः

संस्थेचे खाते संस्थेच्या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत अथवा मान्यता व प्राप्त सहकारी बँकेत ठेवण्यात येईल व ते खाते अध्यक्ष, उपाध्यक्ष यापैकी एक व सचिव यांच्या संयुक्त सह्यांनी चालविण्यात येईल.

२३) संस्थेच्या सभासदांची यादीः

संस्थेच्या सभासदांची यादी संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १५ व संस्था नोंदणी (महाराष्ट्र) नियम १९७१ चे नियम १५ नूसार परिशिष्ठ ६ मध्ये दिलेल्या नमुण्यात ठेवण्यात येईल.

२४) नियम आणि नियमावली बदलः

संस्थेच्या नियम व नियमावलीत दुरूस्ती बदल अथवा वाढ करावयाची असल्यास ती वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या ३/५ बहुमताने करण्यात येईल.

अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE NASHIK

२५) संस्थेच्या नांव व उद्देशात बदलः

संस्थेचे नांव व उद्देशात बदल करावयाचे झाल्यास ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम अथवा १२ अ प्रमाणे करण्यात येईल.

२६) विसर्जनः

संस्थेचे कार्य काही कारणामुळे बंद झाल्यास ती संस्था विसर्जीत करावयाची असल्यास ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० चे कलम १३ व १४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रमाणित करण्यात येते की, सदर नियम व नियमावली कल्पतरू समाजसेवा मित्र मंडळ, नासिक या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे.

अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव

सत्यप्रत

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नाशिक विभाग नाशिक

DHANVANTARI HOMOEOPATHIC MEDICAL COLLEGE AND HOSPITAL & RESEARCH CENTRE ★ NASHIK